# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/06/2023 (मंगळवार) दुपार

### विनयभंग

पो.स्टे. जलालखेडा :- दिनांक १८.०६.२०२३ चे ००/०० वा. ते ००/३० वा. सुमारास फिर्यादी ही रात्री १०.३० वा. दरम्यान जेवन करून गरमी होत असल्याने फिर्यादी व तिचे पती हे स्लॅपवर झोपण्यासाठी गेले व फिर्यादीचे मुलगा व मुलगी हे घरात झोपले व सासु अंगनात झोपली असता रात्री अंदाजे १२.०० वा. दरम्यान **आरोपी नामे- गोलु सुभाष सलामे** हा जिन्याच्या पायऱ्या वरून घराचे स्लॅप वर आला व फिर्यादी झोपली असता आरोपीने फिर्यादीचा हात पकडुन तिच्या तोंडावर हात ठेवुन चाल तिकडे असे म्हणाला तेव्हा फिर्यादी ओरडली असता फिर्यादीच्या बाजुला झोपलेले पती उठले असता पती सोबत आरोपी नामे गोलु नि झटापट केली व आजुबाजुचे गावातील लोक जागे झाल्याने आरोपी गोलु सलामे पळुन गेला तरी फिर्यादीचे गावात राहणारा आरोपी गोलु सलामे याने फिर्यादीचा हात पकडुन तिच्या तोंडावर हात ठेवुन चाल तिकडे असे म्हणुन फिर्यादीचा विनंयभग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५२, ३५४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा पुरूषोत्तम धोंडे, ब. नं ३२२ मो. नं. ८६०५३२२३२२ हे करीत आहे.

### घरफोडी

पो.स्टे. बुट्टीबोरी :- अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील प्रभाग क्र. ९ बुट्टीबोरी ता. जि. नागपुर येथे दि. १८/०६/२०२३ चे २२.३० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे- सौ. आयशा तौशीफ कच्छी, वय ३२ वर्ष, रा. कडु कॉलोनी, सौंसर जिल्हा छिंदवाडा (मध्यप्रदेश) ह. मु. वार्ड नं. ९ बटुटीबोरी ता. जि. नागपुर व घरातील सर्वजण शेजारील सलीम शेख यांचे घरी हज यात्रा निमीत्य जेवणाचे कार्यक्रमाला गेले. त्यादरम्यान फिर्यादी लिफाफा आणण्यास कार्यक्रमातुन घरी परत आली असता एक अनोळखी इसम वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष त्यांचे घरात घुसुन बेडरूम मध्ये असलेल्या कपाटातील बॅगमधुन पैसे चोरी करतांना दिसल्याने फिर्यादीने त्याला "तुम यह क्या कर रहे हो!" असे हिंदीमध्ये म्हटल्याने त्या अज्ञात इसमाने फिर्यादीचे केस ओढुन गळा ओढणीने आवळण्याचा प्रयत्न केला व चाकुचा धाक दाखवुन कपाटात असलेल्या बॅगमधील ५०० रूपयाचे नोटा असलेले एकुण २०,००,०००/- रूपयांपैकी १२,००,०००/- रूपये इतकी रक्कम जबरीने चोरी करून पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बुट्टीबोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५८, ४५९, ३८० भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. प्रशांत भोयर पो.स्टे. बुटीबोरी मो. नं. ९९२३१११२७० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**